नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/१०/२०२५ (रविवार )**

---

## अवैधरित्या देशीदारू,मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ११ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २५/१०/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगुन विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन एकुण किंमती ६,३१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी आशीष डेमन तांडेकर,वय ३० वर्षे,रा. तांडा ता. मौदा,जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन जलालखेडा येथे** आरोपी नामे अरुण पंजाबराय डाते, वय ४७ वर्ष, रा. खापा (घुडन) ता. नरखेड जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नरसिंग मुलचंद जाधव, वय ३७ वर्ष, रा.चाकडोह, ता काटोल आणि जयेंद्र मनोहर कौरती, वय ४८ वर्ष, रा. शेकापुर, ता काटोल यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे श्रीराम व्यंकोजी गोंडाने, वय ७५ वर्ष, रा. जामगाव खुर्द, ता. काटोल, ह.मु. मोहगाव ढोले, ता.टोलका, रवीद्र शंकरराव गजभीये, वय ४५ वर्ष,रा. ढवळापुर ता.काटोल आणि महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे शंकर ईश्वरराव सोनवाने, वय २३ वर्ष, रा, आग्रा ता नरखेड, भोजराज गोपालराव शिर्वे, वय ४६ वर्ष, रा, वार्ड क्र १५ नरखेड, ता.नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर येथे** आरोपी नामे अक्षय सुरेश जोगी, वय २९ वर्ष, रा सदभवना कॉलनी, पाटनसावंगी, ता सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद आहे **पोलीस स्टेशन वेलतुर येथे** आरोपी नामे महेश मनिराम

बावणे, वय ३६ वर्ष, रा. वार्ड नं. ०२ वेलतूर, ता कुही जि नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे.अशा ११ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ११ गुन्हे दाखल केले आहे.

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक २६/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन कुही** अंतर्गत सहा. पोलीस निरीक्षक श्री हरीशचंद्र इंगोले, पोलीस स्टेशन कुही यांनी बस स्टॉप कुही येथे नागरिकांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

**१. त्वरीत लोन प्राप्त करण्यासाठी लोन ॲप चा वापर करत असणार तर सावध व्हा. लोन घेताना तुम्हाला तुमची वैयक्तीक माहीती मागितली जाते. लोन न देताच तुम्हाल लोन दिल्याबाबत फेक मॅसेज पाठविला जातो. तसेच आपल्याला लोन ची परत फेड करण्यासाठी दबाव टाकुन वैयक्तीक माहीती लीक करण्याची धमकी दिली जाते. लोन ॲप चा वापर करून लोन घेत असाल तर लोन ॲप आर.बी.आय किंवा एन.बी.एफ.सी वर नोंदणीकृत आहे किंवा नाही याबाबत पडताळणी करून घ्या. त्वरीत पैसे मिळविण्यसाठी आपली वैयक्तीक माहीती आणि बॅकेची डिटेल्स् कधीही देवुन नका.**

**सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी www.cybercrime.gov.in या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक 1930, 1945 यावर तक्रार नोंदवा.**



## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २५/१०/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २६/१०/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री पराग पोटे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच नाकाबंदी करून नाकाबंदी दरम्यान संशयीत

वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये कोंढाळी पोलीस स्टेशन यांच्या सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने